पुणे जिल्हा परिषद, पुणे

यशवंतराव चव्हाण भवन,

माध्यमिक शिक्षण विभाग

जा. क्र.: शिक्षण/माध्य/४९८ /२०१५

पुणे दि.११/०२/ २०१५

प्रति,

गट शिक्षणाधिकारी,

ता. ____________ जिल्हा–पुणे

विषय: मित्र उपक्रम अंमलबजावणी व १२ दिवसीय विपश्यना–मित्र प्रशिक्षणासाठी शिक्षकांची निवड करण्याबाबत

संदर्भ: १. परिपत्रक क्र. संकीर्ण २०११/२९६/११/माशि–३ दि. २७ जानेवारी २०१२.

२. परिपत्रक क्र. संकीर्ण २०१२/ विपश्यना/१५क (८)/६६०१ दि. ११(१२) जुलै २०१२.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.पुणे यांचे दालनात दि. ६/१/२०१५रोजी झालेल्या आढावा बैठकीतील निर्णयानुसार

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये राज्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांत आनापानच्या नियमित सरावाद्वारे इयत्ता ५ वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचा मानसिक, बौद्धिक, गुणवत्ता विकास घडवून, शील सदाचार संपन्न प्रज्ञावंत भावी पिढी निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरणारा महत्त्वाकांशी "मित्र उपक्रम" कार्यांवित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मित्र उपक्रमांतर्गत केंद्र प्रमुख आणि विस्तार अधिकारी तसेच माध्यमिक आणि ५वी व वरील इयत्ता असलेल्या प्राथमिक शाळातील शाळांतील शिक्षकांसाठी तालुकास्तरावर १ दिवसीय मित्र उपक्रम–आनापान परिचय आणि शालेय अंमलबजावणी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आल्या होत्या. त्यात पुणे जिल्ह्यातील एकूण १५००च्यावर शिक्षक आणि अंदाजे २२० केंद्र प्रमुख व शिक्षण विस्तार अधिकार सहभागी झाले होते. मित्र उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी आणि विद्यार्थ्यांना उपक्रमाचा लाभ मिळावा म्हणून आपल्या तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुखांना पुढील कार्यवाही करावयाचे आदेश आपल्या स्तरावरून देण्यात यावेत.

१. केंद्रातील सर्व शिक्षकांचे मित्र उपक्रम–आनापान परिचय व शालेय अंमलबजावणी प्रशिक्षण पूर्ण करून घेणे.

२. मित्र उपक्रम अंमलबजावणी सुरू न झालेल्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना ती लगेच सुरू करण्याचे आदेश देणे.

३. मित्र उपक्रम सुरू झालेल्या शाळांत अंमलबजावणी योग्य प्रकारे होत आहे का ही तपासणी करून शिक्षण विभागाला सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अहवाल सादर करणे.

४. प्रत्येक केंद्रातील किमान २–३ अनुभवी इच्छुक शिक्षकांची १२ दिवसीय प्रशिक्षणासाठी निवड करून त्यांच्या संमती–अर्जपत्रासह यादी ई–मेलने ( pvs.mitra@gmail.com) किंवा प्रत्यक्ष विपश्यना केंद्र स्वारगेट, पुणे तेथे पोचती करणे.

५. संबंधीत शिक्षणाधिकारी आणि विपश्यना मित्र कक्ष समन्वयकांच्या मदतीने लवकरात लवकर त्यांचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन करून तो पूर्ण करून घेणे.

सोबत आदेशाची प्रत जोडली आहे

शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. पुणे
सदस्य, मित्र उपक्रम–जिल्हा समिती

शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. पुणे
सदस्य–सचिव मित्र उपक्रम–जिल्हा समिती

प्रत : माहितीसाठी सविनय सादर: मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पुणे तथा अध्यक्ष, मित्र उपक्रम–जिल्हा समिती